# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## वित्त व लेखा विभाग
## आय.एस.ओ.९००१-२०१५ युनिट
## परिपत्रक

विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेतर सेवकांसाठी सामुहिक वैद्यकीय विमा योजना आणि सामुहिक वैयक्तिक अपघात योजना व त्यांच्या नातेवाईकांसाठी सामुहिक वैद्यकीय विमा योजना दि. ११ नोव्हेंबर, २००४ पासून राबविण्यात येत आहे. सदर पॉलिसी ही Floater Policy या प्रकारची आहे. सेवक व सेवकांचे नातेवाईक मिळून विम्याची सध्याची कमाल मर्यादा रुपये ३ लाख दि. ११/११/२०१५ पासून करण्यात आलेली आहे.

या परिपत्रकाद्वारे आपणांस कळविण्यात येते की, विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार पंधराव्या वर्षी (दि.११/११/२०१८ ते १०/११/२०१९) झालेल्या नूतनीकरणापासून सेवकांच्या नातेवाईकांची संख्या ३ वरुन ५ वाढविण्यात आली आहे ती पुढीलप्रमाणे आई, वडील, सासू, सासरे, पती/पत्नी, जास्तीत जास्त दोन मुले यापैकी कोणतेही पाच नातेवाईक. तसेच विमा पॉलिसी दि ओरिएण्टल इन्शुरन्स कंपनीला देण्यात आलेली असून पॉलिसीच्या क्लेमबाबतचे कामकाज एमडीइंडिया हेल्थकेअर सर्व्हिसेस (टीपीए) प्रा. लि. पुणे करणार आहेत.

सेवकांचा विमा हप्ता म्हणून १००% रक्कम व सेवकांच्या नातेवाईकांची विमा हप्त्याची ५०% रक्कम विद्यापीठ निधीतून अदा करण्यात आली व ५०% रक्कम सेवकाच्या माहे डिसेंबर, २०१८ ते फेब्रुवारी, २०१९ च्या वेतनातून कपात करण्यात येत आहे. ती खालीलप्रमाणे

| विद्यापीठ निधीतून अदा केलेली रक्कम | | | सेवकाच्या वेतनातून नातेवाईकाची वसूल करावयाची ५०% रक्कम | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| सेवक रु. | नातेवाईक रु. | एकूण रक्कम रु. | माहे डिसेंबर २०१८ वेतनातून कपात होणारी रक्कम रु. | माहे जानेवारी २०१९ वेतनातून कपात होणारी रक्कम रु. | माहे फेब्रुवारी २०१९ वेतनातून कपात होणारी रक्कम रु. | एकूण कपात होणारी रक्कम रु. |
| १२६२६/- | २६३७.३० एक नातेवाईक | १५२६३.३० | ४३९/- | ४३९/- | ४४१/- | १३१९/- |
| १२६२६/- | ५२७४.६० दोन नातेवाईक | १७९००.६० | ८७९/- | ८७९/- | ८८०/- | २६३८/- |
| १२६२६/- | ७९११.९० तीन नातेवाईक | २०५३७.९० | १३१९/- | १३१९/- | १३१९/- | ३९५७/- |
| १२६२६/- | १०५४९.२० चार नातेवाईक | २३१७५.२० | १७५८/- | १७५८/- | १७६०/- | ५२७६/- |
| १२६२६/- | १३१८६.५० पाच नातेवाईक | २५८१२.५० | २१९८/- | २१९८/- | २१९९/- | ६५९५/- |

तरी सदर परिपत्रकात नमूद केल्याप्रमाणे सेवकांच्या नातेवाईकांचा विमा हप्ता कपात करण्यात येणार आहे, याची कृपया नोंद घ्यावी.

सीए अतुल पाटणकर,
वित्त व लेखा अधिकारी

गणेशखिंड, पुणे - ४११००७.
जा.क्र. वित्त/२०१८-१९/१५३१
दिनांक : ३१ डिसेंबर, २०१८

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :**

| | |
|---|---|
| १. मा. विभागप्रमुख<br>सर्व शैक्षणिक विभाग,<br>सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ<br>२. मा. शाखाप्रमुख<br>सर्व प्रशासकीय शाखा,<br>सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ | ) यांना विनंती करण्यात येते की, आपल्या विभागामधील शिक्षक व शिक्षकेतर सेवकांच्या निदर्शनास प्राधान्याने सदरचे परिपत्रक आणावे. |